# नियमित दिवाणी दावा क्र.८/२०२२ निशाणी क्र.०५ खालील आदेश
**(CNR No.MHNS160000742022)**

०१. प्रस्तुतच्या अर्जान्वये वादी यांनी अशी तुर्तातुर्त विनंती केली आहे की, दावा मिळकत कलम १ मधील मिळकत प्रतिवादी क्र.३ यांचे नावावर फेरफार क्र.२२५ प्रमाणे बेकायदेशीरपणे आहे याचा गैरफायदा प्रतिवादी क्र.३ यांनी घेवुन दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे म्हणजे खरेदी, विक्री, गहाण, बक्षीस, मृत्युपत्राने तबदील करु नये तसेच त्यावर कर्जाचे बोजे निर्माण करु नये.

०२. प्रतिवादी यांनी अभिलेखावर प्रस्तुत अर्जास जबाब व कैफियत दाखल करुन सविस्तर कथन करुन वादीची कथने नाकारली आहेत.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद श्रवण केला.

०४. वादीची कथने व दप्तरी दाखल असलेल्या दस्तऐवजांवरुन खालील मुद्ये विचारार्थ आले, त्यावर पुढील कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| अ.क्र. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द करतात काय की, त्यांना प्रथमदर्शनी वाद आहे ? | होकारार्थी. |
| २. | वादी असे सिध्द करतात काय की, सोईचे संतुलन त्यांच्या हक्कात आहे ? | होकारार्थी. |
| ३. | वादी असे सिध्द करतात काय की, अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे अनिरसनीय असे नुकसान होईल? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: का र ण मि मां सा ::

मुद्ये क्र.१ ते ४ **:-**

०५. मुद्या क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्ये एकत्रीत चर्चेसाठी घेतले आहेत. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्या दाव्यातील व कैफियतमधील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक तेवढीच

कथने कथीत केली आहेत.

०६. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी जाहीर ठराव करुन मिळण्यासाठी, दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन तुटक कब्जा मिळण्यासाठी तसेच निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा कलम अ व ब व इतर वडीलोपार्जित मिळकत हया मयत दादा दिपा कासव यांच्या वडीलोपार्जित मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या असुन त्यांना प्रतिवादी क्र.१ व मयत नामदेव, मयत शंकर, मयत सुर्यभान अशी मुले होती व आहेत व त्याप्रमाणे तशी वारस नोंद मिळकतीच्या अभिलेखा सदरी झालेली असुन सदर मिळकतींचा उपभोग घेत असतांना, सदर दादा कासव यांचा मुलगा शंकर मयत झाल्यानंतर दावा मिळकत व इतर वडीलोपार्जित मिळकतींचे सन १९९६ मध्ये वाटप करण्यात आले व सदर वाटपाची मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वतंत्र वाटणीस आल्या व त्याप्रमाणे दावा कलम १ ब मधील मिळकत देखील प्रतिवादी क्र.१ यांचे स्वतंत्र वाटणीस दिली. मात्र सदर मिळकतींचे वाटप दाखविले नाही. सदर वाटप हे फेरफार क्र.२०३ प्रमाणे मिळकतीच्या अभिलेखासदरी नोंदले गेलेले आहे. सदर वाटपाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचीच कब्जेवहिवाट आहे व दावा कलम १ ब या मिळकतीस प्रतिवादी क्र.४ ते १९ यांची नावे पोकळीस्त व बिनकब्जाची नोंद आहेत. त्यांचा त्यामध्ये प्रत्यक्ष कब्जा नाही.

०७. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ याचा प्रथम विवाह वादी यांची आई सखुबाई हिचे बरोबर झालेला असुन प्रतिवादी क्र.१ यांना प्रथम पत्नी सखुबाई हिचेपासुन वादी ही दि.०२.१०.१९६२ रोजी जन्माला आलेली आहे आणि वादी यांची आई सन १९६३ सालामध्ये मयत झालेली आहे. त्यानंतर, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ हिचे बरोबर दुसरा विवाह केला व सदर दुस-या विवाहापासुन प्रतिवादी क्र.३ हा मुलगा जन्माला आलेला आहे. वादी यांचा विवाह झाल्यानंतर वादी हया गावी अधुनमधुन येत जात असत व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या बरोबर दावा मिळकत कलम १अ व १ब मधील मिळकती एकत्रात वहिती करत असत. अशाप्रकारे वादी यांचा दावा मिळकतीमध्ये अविभक्त हिस्सा असुन सरसनिरस मानाने वाटप अदयाप झालेले नाही. असे असतांना, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी माहे नोव्हेंबर २०२१

मध्ये वादी यांना एकत्रात वहिती करण्यास हरकत, अडथळा केला आणि दावा मिळकतीशी तुझा कोणताही संबंध नाही अशी भाषा बोलुन वादी यांचा दावा मिळकतीमधील हिस्सा व कब्जेवहिवाट नाकारली. तसेच, दि. ०९.०८.१९९९ रोजी दावा कलम १अ मधील मिळकत वादी यांची संमती न घेता प्रतिवादी क्र.३ यांच्या नावावर बेकायदेशीरपणे फेरफार क्र.२२५ अन्वये करुन दिल्या. वास्तविकपणे प्रतिवादी क्र.१ यांना संपुर्ण मिळकती प्रतिवादी क्र.३ यांचे नावावर करुन देण्याचा कायदयाने कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही म्हणुन फेरफार क्र.२२५ हा बेकायदेशीर आहे.

०८. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५, ९, १०, १४ ते १६ यांनी नि.क्र.१७ येथे त्यांची कैफियत देवुन अर्जातील संपुर्ण कथने नाकारली आहेत व त्यांनी त्यांचे म्हणणे असे कथित केले आहे की, प्रतिवादी क्र.१ यांचा प्रथम विवाह सखुबाई यांच्या बरोबर झालेला होता व सदर विवाहापासुन वादी हया जन्माला आलेल्या आहेत आणि वादी यांची आई त्यानंतर मयत झालेली आहे आणि त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ हिचे बरोबर विवाह केला आणि सदर दुस-या विवाहापासुन प्रतिवादी क्र.३ हा मुलगा जन्माला आलेला आहे. वादी यांचे लग्न प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.२३.०३.१९७६ रोजी मोठया थाटामाटात करुन दिलेला असुन व वादी यांना इतरही मदत केलेली आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांनी वादीचे कुटुंबीयांना उसवाड येथे ४ ते ५ बिघे जमीन खरेदी घेवुन दिलेली आहे.

०९. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, सन १९९६ सालामध्ये दावा मिळकती हया प्रतिवादी क्र.१ यास फेरफार क्र.२०३ प्रमाणे स्वतंत्र वाटपात आलेल्या असुन त्या मिळकतीशी वादी यांचा कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध नाही. दि.०९.०८.१९९९ रोजी दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्या नावावर करुन दिलेल्या आहेत व त्याचा फेरफार क्र.२२५ नोंदलेला आहे. प्रतिवादी क्र.३ हा दावा मिळकत कलम १ अ चा कायदेशीर मालक व कब्जेदार झालेला असुन त्याची माहिती वादीस पुर्वीपासुन होती.

१०. अभिलेखावरील प्रतिवादी यांच्या कैफियतीचे अवलोकन केले असता,

प्रतिवादी यांना हे मान्य आहे की, प्रतिवादी क्र.१ यांची प्रथम पत्नी सखुबाई होत्या व त्या वादी यांच्या आई होत्या व त्या मयत आहेत व त्यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांचे बरोबर विवाह केलेला आहे. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती नाहीत असे स्पष्टपणे कथन प्रतिवादी यांचे नाही. मात्र, ते हे नाकारतात की, दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप सन १९९६ मध्ये झालेले असुन त्याप्रमाणे फेरफार क्र.२०३ नोंदविण्यात आलेला आहे. वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन सकृतदर्शनी असे स्पष्ट होते की, दावा मिळकतीच्या सातबारा सदरी वादी यांच्या नावाची नोंद जरी नसली तरी दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकती नाहीत असे प्रतिवादी यांचे कथन नसल्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी यांचा हक्क आहे असे सकृतदर्शनी दिसते. तसेच, प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या अनुषंगाने आवश्यक तो सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये वादी यांचा दावा मिळकतीमधील सकृतदर्शनी दिसत असलेला हक्क सदयस्थितीला संरक्षित करणे आवश्यक वाटते कारण फेरफार क्र.२२५ अन्वये दावा मिळकतीच्या अभिलेखा सदरी प्रतिवादी क्र.३ यांच्या नावाची नोंद झालेली असुन त्या नावाच्या आधारे दावा मिळकती हया भविष्यामध्ये तबदीली होवु शकतात. जर त्या तबदील झाल्या तर दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होईल. दाव्याचा निकाल गुणदोषावर देणे अडचणीचे होईल. सबब, वादीस सकृतदर्शनी खटला आहे असे माझे मत आहे. न्यायाचा तराजु वादी यांचे बाजुने आहे. अर्ज नामंजुर झाल्यास वादी यांच्या न्यायहक्कावर गदा येवुन त्यांना अपरिमित असे नुकसान होवु शकते. सबब, मी मुददा क्र.१ ते ३ यांचे उत्तर होकारार्थी देत असून मुद्दा क्र. ४ साठी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: **आ दे श** ::

१. निशाणी क्र.५ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. या दाव्याचा अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र.३ यांनी दावा मिळकती संदर्भात विक्री, गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्र व इतर कोणत्याही मार्गाने तसा व्यवहार करु नये व दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम सदर प्रतिवादी यांना देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

SUNIL
BHIMRAO
MANE

Digitally signed by SUNIL BHIMRAO MANE
Date: 2023.06.19 17:03:29 +0530

ठिकाण :- चांदवड.
दिनांक :- १९.०६.२०२३.

**(सुनिल भि. माने)**
सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
चांदवड.